

# गर्भमासानुमासिक चिकित्सेतील द्रव्यांचे द्रव्यगुणकर्म विवेचन।।



वैद्य मदन टोंगे

गर्भमासानुमासिक चिकित्सेतील प्रथम तीन महिन्यातील द्रव्यांचे द्रव्यगुणकर्मविवेचन आपण नोव्हेंबर २०१८ च्या अंकात पाहिले. पुढील विवेचन याप्रमाणे -

**चतुर्थ मासे** – चतुर्थ मासामध्ये आधीच्या तुलनेत गर्भ अधिक स्थिर झालेला असतो, त्याचप्रमाणे सर्वांग प्रत्यंग विभाग प्रव्यक्त होतो. हृदय व्यक्त झाल्याने गर्भामधे चेतना धातुची अभिव्यक्ती होते. According to modern, in 4th month of pregnancy, organogenesis of heart becomes clear, kidney starts to work. Systems, specially circulatory systems start developing. Embryo passes urine and there is continues developement of nervous system. combination of drug like Dhamasa and Rasna promotes and initiates pulsation movements. (spandan). Yashtimadhu balances the heat genereated due to spandan. गर्भाची स्थिरता अधिक झाल्याने गर्भिणीला अधिक गुरुता जाणवते किंवा अत्याधिक गुरुगात्रता असते. वरील गर्भाची आणि गर्भिणीमध्ये निर्माण झालेल्या लक्षणानुसार बल्य, गर्भपोषक, श्रमहर, वातहत, बृंहण, रस-रक्तप्रसादक अशा वरील द्रव्यांची योजना केलेली आढळते. तसेच अनंता, सारिवा हे रक्तवह स्त्रोतसावर कार्य करणारी द्रव्ये आहेत. त्यायोगे गर्भाशय व गर्भ यावर परिणाम करतात. पद्मा हे द्रव्य गर्भस्थापक आहे.

## गर्भमासानुमासिक चिकित्सेतील द्रव्यांचे द्रव्यगुणकर्माचे तक्तारूपी विवेचन – ⁕ चतुर्थ मासे

| द्रव्य | रस विपाक वीर्य | ग्रंथकार | गुण | कर्म |
|---|---|---|---|---|
| १. अनंता (सारिवा) | मधुर-मधुर-शीत | भा. प्र. | स्निग्ध, गुरू | अग्निमांद्य, अरूचि, अस्त्रप्रदरनाशनम् |
| २. यवास | मधुर, तिक्त-कटु-शीत | भा. प्र. | लघु | तृष्णा भ्रान्तिजित् |
| ३. धमासा | कटु, तिक्त, मधुर-कटु - शीत | नि.र. | - | रक्तशुद्धीकर, रक्तरूजापहा |
| ४. रास्ना | कटु, तिक्त-कटु-शीत | भा. प्र. | - | सुस्वरत्वककरी, रूच्या, हत्कण्ठ-मुखशोधिृ |
| | | रा.नि. | - | दीपन, मुखदोषनुत |
| ५. पद्मा | कषाय, तिक्त-कटु-शीत | चरक | - | वर्ण्य, वेदनास्थापन |
| | | भा. प्र. | लघु | गर्भस्थापनं रूच्यं वमिव्रणतृषाप्रणुत |
| | | ध.नि/रा.नि. | स्निग्ध | ज्वरछर्दीविषापह, मोहदाहज्वरभ्रान्ति-शान्तिकृत |
| | | सिद्धयोग-संग्रह | - | गर्भस्थापक |
| ६. मधुयष्टिका | मधुर-मधुर-शीत | भा. प्र. | स्निग्ध, गुरू | बलवर्णकृत, चक्षुष्य, छर्दीतृष्णाग्लानि-क्षयापहा |

**बहुप्रजेपेक्षा सुप्रजेला महत्व आहे.**